वै.शि.व औ.द्र.वि. / वैसेवा-4

# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारीतील वर्ग-3 व वर्ग-4 ची सरळसेवेची पदे भरण्यासंदर्भात व बाहयस्त्रोताद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांबाबत मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि. 17.10.2022 रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे बैठक संपन्न झाली.

2. सदर बैठकीस सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग), आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोध), उपसचिव (प्रशासन), उपसचिव (वैसेवा-4) संचालक (वैद्यकीय शिक्षण व संशोधन), संचालक (आयुष संचालनालय) व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

3. सदर बैठकीस उपसचिव (वैसेवा-4) यांनी वर्ग-3 व वर्ग-4 या सरळसेवेच्या पदभरती संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दि. 04.05.2022 च्या शासन निर्णयानुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत माहिती दिली. यासंदर्भात बैठकीत उपस्थित मुद्ये व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ. क्र | मुद्या | निर्देश | कार्यवाही करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| 1 | वर्ग-3 ची सरळसेवेची पदभरती करण्यासाठी संस्थेची निवड करणे | सदर पदभरती टी.सी.एस. या कपंनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) यांनी संस्थेबाबत प्राथमिक चर्चा करुन सुधारीत प्रस्ताव शासनास एक आठवडयात सादर करावा. | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोधन) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग |
| 2 | वर्ग-4 ची सरळसेवेची पदभरती करण्याबाबत | संबंधित अधिष्ठाता यांनी जिल्हा निवड समितीकडे सरळसेवेने भरावयाच्या र्ग-4 च्या पदांचे मागणीपत्र सादर करुन पदभरतीबाबत पाठपुरावा करावा. | संचालक (वैद्यकीय शिक्षण व संशोधन) अधिष्ठाता (सर्व) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संचालक (वैद्यकीय शिक्षण) यांनी याबाबत दर आठवडयाला आढावा घ्यावा. | |
| 3 | वर्ग-3 ची सरळसेवेतील अनुकंपासाठी राखीव पदांबाबत | सदर पदांवर अनुकंपा तत्त्वावर उमेदवार उपलब्ध होत नसल्याची खात्री करुन ही प दे सरळसेवेने भरण्याबाबत प्रस्ताव शासनास दोन आठवडयात सादर करावा. | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोधन)<br>उपसचिव (वैसेवा-4)<br>उपसचिव (औषधे-1 / आयु-1) |
| 4 | वर्ग-3 व वर्ग-4 च्या बिंदुनामावलीबाबत | सरळसेवा भरतीकरीता सर्व संस्थांमधील बिंदुनामावल्या अद्ययावत राहतील, याची खातरजमा करावी. जाहिरातीकरीता मागणीपत्र तयार ठेवावे. | आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोधन)<br>अधिष्ठाता (सर्व) |
| 5 | नियमित पदावरील बाहयस्त्रोताद्वारे पदे भरण्याबाबत. | वर्ग-3 व वर्ग-4 च्या नियमित मंजूर असलेल्या पदांपैकी रिक्त असलेल्या 4445 पदे बाहयस्त्रोताद्वारे भरण्यास अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली समितीने दि. 03.03.2022 रोजी मान्यता दिल्यानुसार ही पदे बाहयस्त्रोताद्वारे भरण्यास शासनाच्या दि. 13.04.2022 अन्वये मान्यता देण्यात आली होती. तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या दि. 04.05.2022 च्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सुचनेनुसार वर्ग-3 व वर्ग-4 ची सरळसेवेची पदे भरण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याने दि. 13.04.2022 च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येऊ नये | उपसचिव (वैसेवा-4)<br>आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोधन)<br>अधिष्ठाता (सर्व) |

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

*********

महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,**

9 वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय, मुंबई-400 001

दूरध्वनी क्र.022, 22719488 Email ID : medd.vaiseva४@gov.in

---

क्रमांक-:बैठक-1011/प्र.क्र.300 / वैसेवा-4
दिनांक :1 नोव्हेंबर, 2022

प्रति,

1) आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई
2) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

विषय :- वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील वर्ग-3 व वर्ग-4 ची सरळसेवेची पदे भरण्यासंदर्भात व बाहयस्त्रोताद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांबाबत मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि. 17.10.2022 रोजी संपन्न

झालेल्या बैठकीचे इतिवृत्त..

महोदय,

वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील वर्ग-3 व वर्ग-4 ची सरळसेवेची पदे भरण्यासंदर्भात व बाहयस्त्रोताद्वारे भरण्यात येणाऱ्या पदांबाबत मा. मंत्री (वै.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. 17.10.2022 रोजी सहयाद्री अतिथीगृह येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडले आहे. सदर इतिवृत्तानुसासर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(सु.द.धोंडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-:

1) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
2) सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय / दंत / आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालये यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
3) निवडनस्ती (वैसेवा-4)